म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा वा
दा. क्र. ५५५८.

# च्या गोष्टी




BVBK-0404554




# गच्चीवरच्या गोष्टी

लेखक

**का. रा. पालवणकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
नौपाडा शाखा.
अ. क्र
विभाग
क्रमांक,
नों. दि.

तिसरी आवृत्ति

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र ............ नों दि ............
वि. ............ क्र. ............

BVBK-0404554

मूल्य चार आणे

| | |
|---|---|
| शकू | ३ |
| शाम | १० |
| शांता | १७ |
| चंदू | २४ |

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति : १९४३
दुसरी आवृत्ति : १९४६
तिसरी आवृत्ति : १९५४

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

—पावसाळ्याच्या दिवसांत, मुलांना गच्चीवर सांगितलेल्या ह्या गोष्टी, ऐन पावसाळ्यांतच तुमच्या हातीं पडण्यांतही एक प्रकारचें औचित्य आहे. शिवाय श्रावण महिन्यांत शाळांना सुट्याही भरपूर !

गोष्टीच असल्यानें तुम्ही सुटीची पर्वा न करतांही त्या वाचाल म्हणा ! वाचा नि पाहा कशा काय आवडतात तें ! ह्यापेक्षां जास्त तरी काय सांगूं मी ?

का. रा. पाळवणकर

220

# शकू



पावसाळ्याच्या दिवसांत बाहेर फिरायला जाणं तितकंसं जमत नाहीं आणि मुलांना घेऊन जाणंही थोडंसं धोक्याचंच वाटतं. मुलंही बहुधा पावसाळ्याच्या दिवसांत फिरायला जायला नाखूषच असत. घराच्या आजूबाजूस जमलेल्या पाण्याच्या डबक्यांतून डुबक्या मारण्यांत आणि कागदाच्या नावा करून वाहत्या पाण्यांत सोडण्यांत जरी मुलांना मौज वाटे, तरी लांबवर फिरायला जाण्याचा कंटाळाच येई त्यांना. असं होतं तरी, घरच्या घरींही मुलांचा गोष्टींचा तगादा माझ्यामागें असेच. संध्याकाळ झाली कीं घराच्या गच्चीवर असलेल्या निवाऱ्याच्या जागीं आम्ही बसत असूं. गोष्टी सांगायचा मला कंटाळा असे अशांतला भाग नाहीं. पण मुलांची उत्कंठा कितपत आहे तेंही पाहाण्यांत मला मौज वाटे. आणि असा दिवस क्वचितच जाई कीं मुलं गोष्टीकरतां टपून बसलेलीं नसत! अर्थात् माझ्या कामकाजाच्या दिवशीं मात्र तीं नाइलाजानें कां होईना पण नाखूष होत.

आम्ही अशींच बसलों होतों अवांतर गप्पा छाटीत गच्चीवर. इतक्यांत ती शकूला कशावरूनशी बोलली, “खुळी आहेस

झालं." आणि शकूला खुळी म्हटल्याबद्दल राग यावा हें स्वाभाविकच होतं. अर्थात् ती रुसून बसली. मुलं रुसून बसलीं कीं मला तें पाहावत नाहीं. तिचा राग घालवावा ह्या हेतूनें मी म्हणालों, " गोष्ट कुणाला ऐकायची आहे ? "

आणि गोष्टीचं नांव काढतांच कोपऱ्यांत बसलेली शकू पुढें सरसावली. मीं सुरुवात केली —

" एक होती मुलगी. तिचं नांव होतं शकू. "

" हें हो काय दादा ? मी नाहीं जा अशानें ... " शकू.

अग पण गोष्टींतली शकू म्हणजे तूं नव्हेस कांहीं ! नांवासारखं नांव नसतं वाटतं दुसऱ्याचं ? चल, ऐक तर खरी. कशी मजेदार आहे गोष्ट !" माझ्या ह्या समजुतीनें शकू पुन्हा नीट बसली.

" तिला होता एक छंद ! लहान होती ती. म्हणून घरांतलीं माणसं लक्ष देत नसत फारसं त्याकडे. तिचा छंद कोणता होता माहीत आहे ? कात्री दिसली कीं ती घ्यायची आणि वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं जे कांहीं दिसेल त्यांतलीं चित्रं कापायचीं. घरांतलीं माणसं कात्री तिच्या हातीं लागूं नये म्हणून जशी काळजी घेत, तशीच वर्तमानपत्रं आणि पुस्तकंही खालीं ठेवीत नसत.



पण अशा वेळीं कापड, कागद घेऊन त्याचे बारीक बारीक तुकडे करीत असे ती कात्रीनें ! हा तिचा छंद घरांतल्या माणसांना जाचक होई. पण लहान होती ती ! शिक्षा करून तरी काय करणार ? असेच एकदा दुसरं कांहीं न सापडल्यानें टेबलावरच्या नक्षीच्या रुमालाचेच तुकडे तुकडे करून टाकले होते तिनें ! आईनें शिक्षाही केली असती तिला पण काय उपयोग होता शिक्षेचा ?"

"एकदा काय झालं, तिची आई कोचावर शिवणकाम करीत बसली होती आणि कांहीं काम आठवलं म्हणून तिला उठावं लागलं मधेंच. सामान आवरतां आवरतां घाईमधें कात्री राह्यली तिथेंच कोचावर !"

"शकू बसली होती आईच्या बाजूलाच आपली जुनी बाहुली घेऊन. बाहुली मोडकी तोडकीच होती ! तिच्या डोक्यावर असलेले सगळे काळे केस नाहींसे झालेले होते. आई उठून गेल्यावर चुकून राहिलेली कात्री तिच्या नजरेस पडली. ती तिनें उचलली आणि इकडे तिकडे फिरूं लागली. कांहींच कापायला दिसेना तेव्हां निराश होऊन एका हातांत कात्री नि एका हातांत बाहुली अशा थाटांत ती कोचावर बसली."



" बाहुली जरी मोडकी होती तरी तिची आवडती होती फार ! तिच्यापाशीं ती खूप खेळत असे. ह्या वेळींही ती बाहुलीला समोर धरून तिच्याकडे पाहात स्वतःशींच कांहींतरी बोलत होती. बाहुलीच्या डोक्यावर केस नाहींत ह्याचं तिला वाईट वाटे. तिच्या डोक्यावरून ती नेहमीं हात फिरवी. आतांही ती तसा हात फिरवीत होती. इतक्यांत तिच्या डोळ्यांसमोर केसांच्या बटा आल्या. त्या तिनें हातानें मागें सारल्या आणि तिला काय वाटलं कुणास ठाऊक ? पण तिनें एकदम कात्री घेतली आणि आपल्या डोक्यावरच्या केसांचा एक झुपका कापला. त्याचे ती बारीक बारीक तुकडे करूं लागली आणि ते बाहुलीच्या डोक्यावर बसवूं लागली. पण ते कसे राहाणार ? अर्थात् ते चिकटवण्याकरतां गोंद पाहिजे हें तिच्या लक्षांत आलं आणि वडिलांची गोंदाची बाटली आणण्यासाठीं म्हणून ती उठून आंतल्या खोलीकडे जाऊं लागली. "

" इतक्या वेळांत कात्री विसरल्याचं आठवलं म्हणून तिची आई घाईनेंच दिवाणखान्यांत येत होती. समोर शकूला पाहातांच तिच्या तोंडून " अगबाई हें काय ? हा काय खुळेपणा ? " असे उद्गार बाहेर पडले. आणि ते ऐकतांच शकूही गांगरली. तिला वाटलं, काय झालं कुणाला ठाऊक ? आणि जेव्हां आईनें तिला



विचारलं, " अग हे केस कुणीं कापले ? " तेव्हां तिनें उत्तर दिलं, " मग आमच्या भावलीला नकोत वाटतं केस ? " आईची नजर कोचावर जातांच सारा प्रकार तिला कळून आला. इतक्यांत घरांतली सारी मंडळी तिथें जमली. त्यांनाही सारा प्रकार समजल्यानंतर हसूं आलं आणि वाईटही वाटलं. मग शकूच्या आईनें शकूला कपाटाच्या मोठ्या आरशासमोर उभं केलं आणि जेव्हां तिनें आपले केस आरशांत पाहिले तेव्हां एकदम तिला कसंसंच वाटलं. आईच्या हातांतून सुटका करून घेऊन ती पळाली नि घरांतल्या एका कोपऱ्यांत जाऊन रडत बसली. "

" घरांतल्या माणसांनाही वाईट वाटलं. पण तिला ' खुळी ' म्हणण्याशिवाय दुसरं करणार काय ? तिच्या वडिलांनीं त्यांतल्या त्यांत तिच्या चेहेऱ्याचा विद्रुपपणा कमी दिसावा म्हणून सारखे केले तिचे केस ! पण नकळत कापले गेलेले केस ते ! मिळून कसे येणार ? आणि मग तिची तिलाच लाज वाटायला लागली बाहेर पडायची ! खूप दिवस ती घरांतच राही नि घरांतच खेळत बसे ! "



" पुढें चार दिवसांनीं तिच्या वडिलांनीं कात्री तिच्या सहज नजरेस येईल अशा तऱ्हेनें

मुद्दामच दिवाणखान्यांत टाकून ठेवली. पण ती पडली होती तिथेंच राहिली. शकूनें त्या कात्रीला हातही लावला नाहीं. इतकंच नव्हे तर तिकडे ढुंकूनही पाह्यलं नाहीं."

"ह्या गोष्टीला आठवडा लोटला नाहीं तोंच दुसऱ्या आठवड्यांत शकूचा वाढदिवस आला. कोणीं कांहीं, तर कोणीं कांहीं अशा भेटी तिला आणल्या होत्या आणि तिच्या आईनें तिच्या हातीं जी पेटी दिली ती तिनें उघडून पाह्यली तों तिला काय आढळलं आंत? शिवणकामाचं सामान आणि त्यांतच एक कात्री!"

"पेटी फारच सुरेख होती आणि शकूला ती आवडलेलीही होती. आंत कात्री पाहून ती काय म्हणते इकडे सर्वांचं लक्ष लागून राह्यलं होतं. दोनतीन वेळां तिनें ती पेटी निरखून पाह्यली आणि परत बंद करून आईच्या हातीं देत ती म्हणाली, किती छान आहे आई पेटी. आतां कनी मी जरा मोठी



झालें म्हणजे शिवणकाम शिकेन, तेव्हां मला खूपच उपयोग होईल तिचा. तोंपावतर ठेव तुझ्यापाशींच ती!"

"तिचे हे शब्द ऐकतांच आईनें तिला जवळ घेतलं आणि पटापट पापे घेत ती म्हणाली, 'गेलं ग बाई खुळेपण! कित्ती

शहाणं झालंय माझं शकुलं.' आणि मग तिनें तिचे पटापट इतके मुके घेतले कीं पुढें तिला बोलायला फुरसतच मिळेना."

झाली संपली माझी गोष्ट! कां शकू कशी आवडली गोष्ट? पण हें ऐकायला शकू होती कुठें तिथें? ती केव्हांच तिच्या मांडीवर जाऊन बसली होती आणि तीही तिचे पापेच घेत होती.



# शाम

दुपारच्या जेवणाच्या वेळीं माझ्या चटकन लक्षांत आलं कीं ताईचं कांहीं तरी बिनसलंय. काय तें कांहीं माझ्या लक्षांत येईना. एकदा वाटत होतं कीं घ्यावं तिला विचारून. पण जेवतांना नको उगाच तसला विषय, म्हणून सोडून दिलं. जेवणानंतर मी थोडा वेळ वामकुक्षी करत पडलों होतों, तेव्हां तिची आई म्हणाली,

"म्हटलं आज ताईसाहेब रागावल्येत माझ्यावर."

"कां बरं? काय झालं? मला वाटलंच होतं जेवतांना. पण उगाच जेवतांना नको म्हणून मी गप्प बसलों."

"ताई विचारत होती कीं आम्ही ट्रिपला जाऊं का? तिच्या शाळेंतल्या मुलींची ट्रिप निघायची होती वाटतं. मीं म्हटलं, नको. तूं नुकतीच आजारांतनं उठली आहेस, अन् त्रासानें पुन्हा आजारीबिजारी झालीस तर? तर म्हणे, आतां मला कुठें काय होतंय? अन् आम्हीं कबूल केलंय कीं मैत्रिणींना नि बाईंना दिखील! मग आतां मैत्रिणी काय म्हणतील?"

"मीं सांगितलं तिला कीं हवंतर माझं नांव सांग त्यांना.

म्हणावं कीं मी आजारांतून नुकतीच बरी झालें आहें म्हणून आई नाहीं मला पाठवीत. तर काय काय बोलली. म्हणे तुझं माझ्यावर प्रेमच नाहीं. मैत्रिणींजवळ आमची फजिती होईल!! एक ना दोन! आणि तेव्हांपासून भाषण नाहीं माझ्याशीं! मग जाऊं दे का तिला ट्रिपला?"

"छे! तूं सांगितलंस तेंच योग्य आहे. ती लहान आहे अजून. तिला काय कळतंय? मुलांची काळजी आईबापांइतकी दुसरं कोण घेणार! तिला कल्पना नाहीं त्याची. असूं दे. बघूं या काय होतंय तें. तूं आपली गप्प राहा."

आणि मग संध्याकाळपावतर कांहीं विशेष घडलं नाहीं. मात्र ताई फारशी खेळतांना किंवा मिसळून वागतांना आढळली नाहीं कुणाशीं.

रात्रीचीं जेवणं झाल्यावर आम्ही गच्चींत बसलों होतों. गांवांत सर्कस आली होती तिचे खेळ लौकरच सुरू होणार होते आणि ती सर्कस आपणांला केव्हां बघायला मिळेल ह्याचा विचार चालला होता मुलांत. मात्र बोलण्यांत ताई भाग घेत नव्हती. पण शकू कुठली गप्प बसायला? तिनें—

'दादा आपण जायचं



सर्कस बघायला. मला खूप आवडते सर्कस! हत्ती, घोडे, वाघ, सिंह कशी कसरत करतात नाहीं!' असं मला हटकलंच.

"हो तर. आधीं खेळ तर सुरू होऊं दे. मग जाऊं या आपण एकदा." असं मीं उत्तरही दिलं.

आणि मग, सर्कशींत वाघ किती असतील? काय काय कामं सिंह करीत असतील? आणि तींतला विदूषक कसकशा गमती करील? इत्यादि गोष्टींबद्दल शकूची बडबड चालू झाली. आमच्या त्या बोलपटांत ताईनें मात्र मुळींच भाग घेतला नाहीं.

सर्कशीच्या विषयाबरोबरच ताईचं मौनही मला जाणवत होतं. अशा स्थितींत कोणती गोष्ट आज मुलांना सांगावी ह्याचा विचार मी करत होतों आणि मनाजोगी गोष्ट आठवतांच मला जरा हसूं आलं. तें पाहून शकू म्हणाली, "दादा, हसलांतसे?"

"एक लहानपणची गोष्ट आठवली मला." माझ्या ह्या उत्तरावर अर्थातच ती सांगण्याचा मुलांनीं आग्रह केला. मी म्हणालों,



"मी तेव्हां १२।१३ वर्षांचा असेन. आमच्या घराशेजारींच एक गरीब बाई राहात असे. तिला एक मुलगा होता. घरची अगदीं गरिबी. त्यामुळें त्याला धड चांगले कपडेसुद्धा

मिळत नसत. माझ्याच वर्गांत होता तो. स्वभावानें फार चांगला. माझी त्याची खूप मैत्री. आणि त्या बाईही आमच्या घरीं नेहमीं जात येत असत. आम्ही सर्व मंडळी जेव्हां, कुठें सिनेमा-सर्कसला वगैरे जात असूं, तेव्हां 'शामला' (त्या मुलाचं नांव) बरोबर घेऊन जात असूं. तो माझा मित्र असल्यानें मला खूपच आनंद होई. आणि त्याची गरिबी लक्षांत घेऊन माझ्या घरचीं वडील माणसंही त्याला आनंदानें बरोबर नेत; आमचं केव्हांही आणि कुठेंही जायचं ठरो, शाम आमच्याबरोबर असायचाच. जणूं कांहीं नियमच ठरून गेला होता तसा."

"एकदा गांवांत अशीच एक सर्कस आली होती आणि रात्रींच्या नऊच्या खेळाला जायचा आमचा बेत ठरला होता. अर्थात् शामलाही बोलवायचं ठरवलं मीं आणि आईला विचारलं, 'आई, शामला बोलावूं ना आपल्याबरोबर सर्कसला?' आई म्हणाली, 'बोलाव कीं.' मी शामकडे गेलों. तों शामची आई समोरच बसली होती. तिला मीं विचारलं, 'शाम कुठें आहे?' ती म्हणाली, 'आहे घरांत. एवढा धावतसा आलास, कसला बेत आहे आज?'



'तसं विशेष कांहीं नाहीं. आम्ही जाणार आहोंत आज सर्कसला आणि शामला त्यासाठींच बोलवायला आलोंय् मी.'

'कधीं जाणार आहांत तुम्ही सर्कसला?' शामच्या आईनें विचारलं.

'रात्रीं नऊच्या खेळाला जाणार आहोंत.' मीं उत्तर दिलं.

'म्हणजे परत यायला निदान एक तरी सहज वाजेल नाहीं का?' शामची आई.

'तें मला काय ठाऊक? वाजेलही कदाचित् एक! पण आम्ही बरोबर आहोंत ना? मग तुम्हांला कसली काळजी?'

'तशी काळजी कांहीं नाहीं मला. पण......'

'पण काय? तुम्ही पाठवणार नाहीं शामला?' मीं घाईनें विचारलं.



"एरवीं मीं कधींच नाहीं म्हटलं नसतं त्याला पाठवायला. पण तुला माहीतच आहे कीं तो नुकताच आजारांतून उठलेला आहे. अशक्त आहे तो, नि शिवाय डॉक्टरांनीं सांगून ठेवलंय कीं कांहीं दिवस त्याला जपायला हवं.

मग सांग बरं कसं पाठवूं त्याला ? जागरणानें त्रास नाहीं का व्हायचा ?' शामच्या आई समजावणीच्या स्वरांत म्हणाल्या.

'त्यांत कसला त्रास होणार ? गमती जमती बघायला मिळणार आणि त्यांत वेळ केव्हां गेला तें समजणारसुद्धा नाहीं त्याला. मग कसला होणार त्रास ?' मीं उत्तर दिलं.

'अरे पण जागरणामुळें शरीराला त्रास व्हायचा तो होणारच ! तो कसा अटकवतां येईल ? शामला तूं आपल्या-बरोबर नेहमीं नेतोस तेव्हां कधीं नको म्हणतें का मी ? त्याला तुमच्याशिवाय दुसरं नेतंय तरी कोण ? तुमच्या घरांतलाच समजतां तुम्ही त्याला ! मग तुमच्याबरोबर पाठवायला मी उगीचच्या उगीच आडकाठी घेईन कशी ? आतां त्याला हें समजलं म्हणजे कदाचित् त्याला वाईट वाटेल मनांतून ! माझ्या एकुलत्या एका मुलाला सर्कस बघायला जायला आणि तीसुद्धा त्याच्या जीवाभावाच्या मित्राबरोबर, कधींच हरकत घेतली नसती मी. वाईट वाटतं तुम्हा मुलांना आई-बापांच्या अशा नाहीं म्हणण्याचं. पण तेंच खरं तुमच्या हिताचं असतं. तुमची जपणूक आणि तुम्हांला होणाऱ्या त्रासाची जाणीव आईशिवाय कुणाला कळणार !'



" शामच्या आईचं बोलणं मला पुरेपुर पटलं होतं. मी कांहींच बोललों नाहीं त्यावर. पण आल्यासारखं शामला भेटून तरी जावं म्हणून मी आंत जाण्यासाठीं मागें वळलों तों शाम समोर उभा ! "

" मी त्याला सर्कशीला जाणार असल्याचं सांगितलंसुद्धा नव्हतं, पण तो आपण होऊनच म्हणाला, ' मीं ऐकलं तुझं नि आईचं बोलणं. आई म्हणते तें अगदीं खरं नाहीं का ? तूं रागावूं नकोस हं माझ्यावर. पण मी कांहीं येणार नाहीं सर्कसला. मग पुढें केव्हांतरी जाऊं आपण बरोबर अं ! ' आणि मग त्यानें गहिंवरल्या स्वरांत म्हटलं, ' पण मला एकदा सांग बघूं कीं तूं रागावणार नाहींस असं ! '

" शामचं तें बोलणं ऐकून मला काय वाटलं तें सांगतां येत नाहीं आतां तुम्हांला. पण मीं त्याला मिठी मारीत म्हटलं, ' रागावणार, मी, अन् तुझ्यावर ! शंकासुद्धा आणूं नकोस मनांत ! ! "

" आणि मग थोडा वेळ त्याच्याशीं इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलून मी परत आलों. काय वाटतं तुम्हांला शामबद्दल आणि त्याच्या आईबद्दलही ? "

मुलं काय देणार उत्तर त्यावर ! गोष्ट संपली. उशीर झाला आणि आम्ही खालीं परतलों. तिनें प्रथम ताईला जवळ घेतलं अन् पाठीवरून हात फिरवीत विचारलं,

" रागावलीस होय माझ्यावर ? '

' छे, मुळींच नाहीं. ' एवढें म्हणून आईला बिलगली ती. तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. कसले होते बरं ते ?




'उच्छाद् आणलाय कार्ट्यांनीं! चालतीं व्हा बघूं इथनं!!' मी घरांत येतांच माझ्या कानांवर तिचे हे रागाचे शब्द पडले.

मुलांनीं कांहींतरी गडबड किंवा हट्ट केला असावा आणि कामाच्या धांदलींत त्यांच्याकडे लक्ष द्यायला तिला वेळ नसतांना तिनें रागानें हे शब्द उच्चारले असावे. एरवीं कोणती आई आपल्या मुलांना असे शब्द उच्चारील! मी घरांत आलों आणि मुलांची गडबड थांबली. ताई मात्र जरा रडत आणि गाल फुगवून बसलेली दिसली मला. काय प्रकार आहे तो जाणून घेण्याची मला उत्कंठा लागलीच होती पण मी होऊन कांहीं कुणाला विचारलं नाहीं. आज कांहीं बडी पाहुणे मंडळी आमच्याकडे यायची होती म्हणून मलाही कांहीं कामं होतींच. मग कांहीं वेळानें त्या कावाकावीचं कारण मला कळलं तें असं.

आज बडे पाहुणे येणार आहेत, तेव्हां आपल्याला नवी साडी नेसायला दे, असा ताईनें आईपाशीं हट्ट धरला. नवी

साडी ताईला खूपच मोठी होईल. बोंगा वाटेल आणि बेढब दिसेल. शिवाय धड चालतांही यायचं नाहीं तिला. त्यापेक्षां जरीचा नवा फ्रॉक आहे तो घाल, असं आईनें ताईला सांगितलं; पण ताईचा हट्ट चालूच राहिला आणि शेवटीं तिनें रागावून वरील शब्द उच्चारले. कामामुळें मला तिकडे जास्त लक्ष देणं शक्यच नव्हतं. ताईची कशीबशी समजूत करून मीं तिला नवा फ्रॉक काढून दिला आणि तो तिनें घातलाही. पण ही गोष्ट मात्र माझ्या मनांत तशीच राहिली.

पाहुणे आले. पाहुणचार घेऊन गेले. ताईच्या फ्रॉकची त्यांनीं प्रशंसाही केली आणि धन्यताही वाटली असेल तिला त्या वेळीं. 'पण आईनें आपल्याला साडी देऊं नये म्हणजे काय?' साडी मिळाली असती तर–असेही विचार तिच्या मनांत आल्याशिवाय राहिले नसतील. मुलें ज्या ज्या वेळीं असा कांहीं हट्ट धरतात त्या त्या वेळीं त्यांची समजूत पटणं कठीण होऊन बसतं. आपली आई वा वडील माणसं सांगतात त्यांत आपलं हितच आहे ही जाणीव त्यांना नसते, म्हणूनच तीं तरी एवढा हेका धरून बसतात. पण ह्या ना त्या रीतीनें ही जाणीव त्यांना करून देणंही तितकंच अवश्य असतं आणि ह्याच दृष्टीनें



त्या वेळीं मी कांहीं विशेषसं बोललों नव्हतों तरी ते विचार मात्र मनांत घोळतच राहिले.

संध्याकाळीं शांतपणें आम्ही जेव्हां गच्चीवर बसलों आणि मुलांना गोष्ट सांगण्याचं काम जेव्हां मजकडे आलं तेव्हां मीं जी गोष्ट सांगितली तीही हट्टी मुलीचीच ! मीं सुरुवात केली —

"शांता नांवाची मुलगी होती. नांव शांता पण हट्टाला पेटली कीं अगदीं महामाया ! रडेल काय, आरडेल काय, रुसेल काय न् फुगेल काय ? एरव्हीं अगदीं गुणाची असलेली शांता केवळ हटवादीपणानें अगदीं नकोशी वाटे पुष्कळ वेळां सगळ्यांना. तिला काय हट्टाचे परिणाम माहीत नव्हते ? तिनें काय हट्टाचा दुष्परिणाम दाखवणाऱ्या गोष्टी वाचल्या नव्हत्या असं नाहीं. पण — तिचा दोष मात्र जाईना."

"शांताच्या वडिलांनीं तिच्या वाढदिवसाला बक्षीस देण्यासाठीं म्हणून एक छानदार बनारसी साडी आणली होती. आणतांनाच त्यांनीं ती जरा मोठी आणली होती. कारण शांता होती लहान पण मौल्यवान वस्तु ती ; जरा मोठी झाल्यावर बरेच दिवस तिला ती नेसायला मिळावी हा त्यांचा मुख्य हेतु ! आणि हें ठेवलेलं धोरण इष्टच नव्हतं का ?"



"शांतानें साडी पाहिली. खूप हर्ष झाला तिला! नाचलीसुद्धा ती कितीदा! आणि चार दोन दिवसांनीं अशाच कांहीं प्रसंगीं तिनें ती साडी आईजवळ मागितली नेसायला."

शांताच्या वयाच्या आणि शरीराच्या मानानें ती साडी होती खूप मोठी आणि जड. पण शांताला काय त्याचं! तीच साडी हवी म्हणून हट्ट धरला तिनें. आईनें दुसरी लहान साडी नेसवतें म्हणून सांगितलं. मोठी साडी तुला पेलणार नाहीं आणि बोंगा दिसेल मोठा. चालतांसुद्धा यायचं नाहीं धड! कित्ती कित्ती समजूत घातली तिनें. पण शांताचं आपलं एकच, 'मला तीच साडी नेसव.' वडिलांनीं समजूत केली तरीसुद्धा कांहीं नाहीं. अखेर आईनें ती नवी लांबरुंद आणि कोरी साडी नेसवली तिला."

"साडी नेसल्यावर खरोखरच शांता गबाळ दिसूं लागली. आणखी ३।४ वर्षांनीं तीच साडी शांताला शोभती! कपडे झाले तरी ज्या वयांत जे शोभून दिसतील तेच हवेत घालायला. नाहींतर ते गबाळ दिसणारच! मग ते कितीका उंची आणि तलम असेनात! पण शांता अगदीं आनंदली आणि सगळ्यांकडे ऐटीनें पाहातच घराबाहेर पडली, आपल्या मैत्रिणीकडे जायला. रस्त्यानें



चालतांना मात्र तो बोंगा संभाळण्यास तिला अडचण वाटूं लागली. पण पुन्हा पुन्हा आपल्या नव्या साडीकडे पाहाण्यांत आणि आपल्याकडे कोण कोण पाहातंय त्याकडे लक्ष देण्यांत तो त्रास तिला असह्य वाटला नाहीं. मैत्रिणीकडे गेल्यावर तिच्या तोंडून होणाऱ्या आपल्या साडीच्या स्तुतीचीं चित्रं मनोमय रंगविण्यांतच दंग झाली होती ती."

"अशा रीतीनें ती रस्ता चालत असतां समोरून एक छोटंसं कुत्रं आलं. त्या कुत्र्यालाही शांताचं तें विचित्र सोंग चमत्कारिक वाटलं कीं काय कोण जाणे! पण तें आलं तेंही रस्त्याला नाक लावीत आणि हुंगत शांताच्याच रोखानें. कुत्रं आपल्याच बाजूला येत आहे असं दिसतांच शांताला भीति वाटली त्याची आणि ती त्याला टाळण्याकरतां दुसऱ्या कडेला वळली. पण कुत्रं कसलं खट्याळ! तेंही तिच्याच बाजूकडे वळलं! शांताची भीति वाढली आणि आट्यापाट्यांच्या त्या खेळाला कंटाळून ती पळूं लागली; पण शांताच्या साडीचा सोगा पायांत अडकून शांता रस्त्यांत पडली! तीसुद्धा धुळींत!! साडीला धूळ लागली, तोंड धुळीनें माखलं आणि रस्त्यावरच्या खडींतला एक खडीचा तुकडाही तिच्या कपाळावर टुपून त्या जखमेंतून रक्तही



येऊं लागलं. ह्या वेळीं तिचा नेहमींचा फ्रॉक असता किंवा तिची छोटी साडी असती तर ती केव्हांच पळत मैत्रिणीकडे गेली असती. पण आतां त्या तशा स्थितींत मैत्रिणीकडे जाणं तिला शक्यच नव्हतं. ती कशीबशी उठली आणि साडीचा बोंगा हातांत धरून रडत रडतच घरीं परतली. बरं तर बरं, ती पडलेली पाहातांच कुत्र्यानें तिथून पोबारा केला होता. नाहींतर तें आणखीन पाठीं लागायचं तिच्या!!"

"घराजवळ येतांच रडंही वाढलं शांताचं! लागल्यामुळें आणि साडीच्या झालेच्या नासामुळें वाटणाऱ्या दुःखापेक्षां तिला जास्त दुःख होत होतं तें लोकं हसलीं त्याचं! लोकांनीं साडीचं कौतुक करायच्या ऐवजीं तीं आपल्याला हसलीं ह्याचंच तिला भारी वाईट वाटत होतं. शांताचा रडवा आवाज ऐकतांच आई बाहेर आली आणि शांताची ती अवस्था पाहातांच धावतच पुढें जाऊन तिनें तिला उचलून घरांत नेलं. साडी बदलून फ्रॉक घातला. डोक्याची जखम धुऊन मलमपट्टी केली आणि नीट निजवून तिच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवूं लागली."



"आतां मात्र शांताला हुंदके येऊं लागले आणि ती मुसमुसून रडूं लागली. ती आतां कां

रडते तें आईच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. तिनें हळुवारपणानें तिची समजूत काढली. मग तिचं समाधान झालं. "

त्याच वेळीं तिचे बोल म्हणाले, 'मुलांना जर ही खात्री पटली कीं आपली आई सांगते तें कांहीं अहिताचं नसतं, किंवा ती उगाच कांहीतरी सांगत नाहीं; त्यांत कांहींतरी तथ्य असतं, मुलांचं हित असतं, तर त्यांचे लहानसहान अनेक अपघात खात्रीनें टळतील'

गोष्ट संपली, तेव्हां मी सहज ताईच्या तोंडाकडे पाहिलं तों तिचे डोळे ओले झाले दिसले. तिच्या नजरेंतूनही ती गोष्ट सुटली नाहीं. तिनें हळू ताईला जवळ ओढलं आणि तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हटलं, 'वाईट नको वाटून घेऊं. गोष्टींतलं सार तेव्हढं ध्यानांत घे कीं झालं. मी कांहीं रागावलें नाहीं तुझ्यावर !'



दादानें तिच्याजवळून कशाकरतांसे पैसे घेतले होते आणि दादा परत आला तो सगळे पैसे खर्च करून. वास्तविक जरूर होती चार पैशांची आणि त्यानें खर्च केले ते चार आणे! अर्थात् ही गोष्ट तिला काय किंवा कुणाही वडील माणसाला कशी रुचणार? आणि मी आलों तेव्हां माझ्या कानीं पडला संवाद तो असा—

'अरे, असे वाटेल तसे पैसे खर्च करून तूं उधळपट्टी करायला लागलास तर कसं चालेल बाबा? चार दिडक्यांची वही आणायची! सुटे नव्हते पैसे म्हणून दिले चार आणे तर सगळे सप्फा करून टाकलेस!' ती.

'पण ह्यांत काय उधळपट्टी केली मीं? रबर आणला, पेन्सिल आणली आणि आण्याचं चाकोलेट आणून खाल्लं, तें मीं एकट्यानें नाहीं कांहीं. सगळ्यांना दिलंय थोडंथोडं!'

'अरे, पण ज्या वस्तूची आपणांला जरूर नाहीं ती चांगली दिसली न् असली तरीसुद्धा ती खरेदी करणं म्हणजे

उधळपट्टीच म्हणतात हो त्याला. आतां आले म्हणजे सांगतें मी कीं बघा आपल्या चिरंजिवांचे प्रताप.' ती.

पण प्रत्यक्ष मीच जेव्हां त्यांच्यापुढें उभा राहिलों, तेव्हां मात्र लागलीच चूपचाप झालं आणि मींही त्यांना दाद लागूं दिली नाहीं. उलट विचारलं, 'काय चाललंय एवढं मायलेकरांचं गुपित ? आम्हांला पण घ्या कीं त्यांत!'

पण पुढें बोलायला कोण राह्यलं तिथें. ती गेली घरांत चहा करायला आणि दादा पळाला बाहेर खेळायला.

ऐकलेल्या संवादांत दादाचा उधळेपणा मला स्पष्ट दिसून आला आणि तो घालवणंही मला आवश्यक वाटलं. कारण ह्यापूर्वींही एकदोनदा त्याचा मला असाच अनुभव आला होता.

संध्याकाळीं जेवण झाल्यावर मी मुलांना म्हणालों, 'चला बघूं मी आज तुम्हांला चंदूची मजेदार गोष्ट सांगणार आहें.' मुलं लगेच माझ्या पाठोपाठ निघालीं आणि आम्ही गच्चीवर आलों. मीं सुरुवात केली—



"एक होता चंदू. त्याचं खरं नांव भालचंद्र पण त्याला म्हणत चंदू. हुशार होता तो खूप. वर्गांत पहिल्या २।३ नंबरांत असायचा सदा तो. मास्तरांनाही आवडे. अभ्यास चांगला, एरव्हीं वर्तनही चांगलं. सर्वांशीं खेळीमेळीनें

वागायचा. त्याच्यांत दोष म्हणजे एकच होता आणि तो म्हणजे उधळेपणा ! ”

“ आईनें बाजारांतून जिन्नस आणायला पैसे दिले नि त्यांतले जरी थोडे उरत असले तरी ते परत यायची गोष्ट नको. तो आपला कांहीं ना कांहीं खरेदी करून आणायचाच ! त्याला हजारदा सांगितलं त्याच्या आईनें नि वडिलांनीं त्याबद्दल. पण त्याचं तें खरं. ”

“ एकदा गांवांत भरलं होतं प्रदर्शन. झुंडीच्या झुंडी लोटत प्रदर्शन बघायला. फारच छान होतं तें. मुलांचा एक छानदारसा स्वतंत्र विभाग होता त्यांत. नाना खेळ होते आणि नाना प्रकारच्या गमती जमतीही होत्या त्यांत. पाहून आलेलीं सर्वजणं नांवाजत त्या प्रदर्शनाला. अर्थात् शाळेतल्या वर्गबंधूकडून ही बातमी समजतांच चंदूलाही तें बघायची इच्छा झाली आणि एका दुपारीं सुटी आहेसं पाहून त्यानें आईची परवानगी घेतली नि चंदू निघाला प्रदर्शन बघायला. आईनें त्याच्या हातावर रुपया ठेवीत म्हटलें,



‘ चंदू बाळ, जपून खर्च कर. उगाच कांहींतरी खर्च करूं नको. नीट जपून जा आणि ये. नाहींतर चुकशील कुठें इकडे तिकडे. आईच्या म्हणण्याला होकार देऊन

चंदूची स्वारी बाहेर पडली आणि प्रदर्शनाकडे तो जवळ जवळ पळतच निघाला."

"मुख्य प्रदर्शनाच्या आवाराबाहेर कितीतरी गर्दी दिसत होती आणि निरनिराळ्या खाद्यपेयांच्या दुकानांची विक्रीही जोरांत चाललेली दिसत होती. दुकानावरचे पदार्थ घेऊन खाण्याची मुलांना एकदा सवय जडलेली असली, म्हणजे मग कांहीं केलं तरी दुकानचे पदार्थ खाल्ल्याशिवाय त्यांना राहावत नाहीं. मग घरीं कितीही चांगले पदार्थ मिळोत. चंदूही कधीं कधीं असे पदार्थ घेत असे आणि आतां तर तो अगदीं स्वतंत्रच होता. तिकिटापुरते पैसे काढून ठेवून बाकीचे बहुतेक पैसे त्यानें बाहेरच उधळले आणि मग तिकिट काढून तो आंत शिरला!"

"आंत गेला तों निरनिराळ्या गमतीजमती, देखावे, निरनिराळीं दुकानं, त्यांतील सुंदर सुंदर वस्तु, (कीं ज्यांचा खरोखर त्याला कितीतरी उपयोग झाला असता) पाहून त्याला समाधान वाटलं, पण त्यांतली एकही पैसे शिल्लक नसल्यामुळें आपण घेऊं शकत नाहीं, ह्याबद्दल दुःख वाटूं लागलं."



"तो तसाच पुढें पुढें चालला. बालविभागापाशीं

आला तों तिथें मुलांची ही गर्दी झालेली दिसली त्याला. कुणी खेळ घेत होतीं, तर कुणी वह्या, कागद, पेन्सिली घेत होतीं. स्वदेशी उत्कृष्ट दर्जाचीं 'फाउंटन पेनं' पाहून चंदूला त्यांतलं एक घेतलं तर किती छान होईलसं वाटलं! आणि किंमतही किती होती, अवघी दहा आणे! एका बाजूला विचित्र गाय आणि मुलगी होती तर एका बाजूला जादूचे प्रयोग चालू होते. प्रत्येकाची बघण्याची फी होती अवघे दोनदोन पैसे. पण चंदूला काय उपयोग? त्याच्या खिशांत दोन दिडक्यासुद्धा आतां उरलेल्या नव्हत्या. खूप वाईट वाटत होतं त्याला. पण करणार काय? वेडगळासारखा इकडेतिकडे तो फिरत होता. प्रत्यक्ष जरी घेतां आलं नाहीं कांहीं तरी तिथें पाहाण्याजोग्या गोष्टी नव्हत्या असं थोडंच होतं? पण मन जाग्यावर नसलं कीं मग काय उपयोग? चंदूचंही तसंच झालं होतं. खिशांतील पैसे संपून गेल्यानें, आणि तेही आपणच संपवून टाकल्यानें त्याला आतां कांहींच घेतां येत नव्हतं आणि गंमतही पाहातां येत नव्हती.



भयंकर शरमला होता तो मनांत! आणि जळफळतही होता स्वतःवर. आईनें सांगितलेलं ऐकलं असतं तर? जपून खर्च कर! हे शब्द त्याला आतां आठवले पण उपयोग काय? वेळ निघून गेली होती!"

"असाच तो इकडून तिकडे फिरत असतां त्याच्या वर्गांतले

सदू सरवटे आणि मधु मुरकुटे मोटारउडी पाहाण्याचीं तिकिटं काढतांना दिसले. चंदूला पाहातांच त्यांनीं त्याला तिकिट काढून आंत चलण्याचा आग्रह केला. पण त्यानें कांहींतरी थापबाजी करून तिथून काढता पाय घेतला आणि तो मागें वळला. पण समोरच लिली लघाटे झकासशी मनीपर्स खरेदी करतांना दिसली. चंदू दिसतांच तिनें त्याला विचारलं, 'काय काय घेतलंस तूं?' चंदू म्हणाला, 'हे: इथें कोण खरेदी करतंय!' मनाबाहेर कांहींतरी बडबडून तो निघाला तो तडक प्रदर्शनाच्या बाहेर."

"घरीं यायला निघाला. रस्त्यानें त्याच्या मनांत आलं, आतां आई विचारील, काय काय आणलंस म्हणून! काय सांगायचं तिला! रुपया कसा खर्च झाला म्हणून सांगायचं! आईकरतां काय आणलंय आपण? आईकरतां नाहीं. स्वतःकरतां नाहीं. छोट्या बेबीकरतां नाहीं! आपण प्रदर्शन पाहायला गेलों होतों हें तरी कसं सिद्ध करणार? फार वाईट वाटलं नि स्वतःच्या उधळपट्टीचा भयंकर रागही आला त्याला! घरीं आला नि सरळ आपल्या खोलींत जाऊन रडत बसला!"



"बराच उशीर झाला. चंदू कां आला नाहीं म्हणून आई बाहेर आली, बघते तों चंदूच्या चपला बाहेर दिसल्या! चंदू

आला वाटतं, मग आहे तरी कुठें म्हणून ती घरांत बघूं लागली. चंदूच्या खोलींत तिनें डोकावलं तों काय दिसलं तिला, चंदू गुडघ्यांत डोकं घालून रडतो आहे. ती चटकन पुढें गेली. चंदूला जवळ घेत म्हणाली,

'काय झालं माझ्या राजाला? कोण बोललं? कुणीं मारलं का तुला? सांग कीं काय झालं तें? कुठें पडलास होय?'

आईच्या त्या प्रेमळ शब्दांनीं चंदूचं रडं थांबण्याऐवजीं तें दुप्पट वाढलं नि तो मोठ्यानें हुंदके देऊं लागला."

"आई पाठीवरून हात फिरवीत होती आणि सारखी काय झालं म्हणून विचारीत होती. बऱ्याच वेळानें चंदू म्हणाला, 'मी नाहीं पुन्हा असं वागणार! तरी आईला कांहींच कळेना. ती खोदून खोदून विचारूं लागली, तेव्हां शेवटीं चंदूनें प्रदर्शनांत घडलेली एकंदर हकीकत तिला सांगितली." आई म्हणाली,

'हात्तेच्या! एवढंच ना! त्यांत कशाला एवढं जिवाला लावून घेतोस? रविवारीं पुन्हा जा बरं तूं! आणखी सगळं सगळं बघून ये तूं, आणि खरोखरच चंदूला पुन्हा तिनें प्रदर्शनाला पाठवलं. ह्या वेळीं तिनें त्याला एका ऐवजीं तीन रुपये दिले होते."



"दुसऱ्या वेळीं जेव्हां चंदू प्रदर्शन पाहून परत आला, तेव्हां त्यानें आईकरतां, वडिलांकरतां आणि स्वतःकरतां निर-निराळ्या वस्तु आणल्या होत्या. बेबीकरतां बाळ आणलं होतं नि तो सारा पसारा आईपुढें मांडून तो तिला प्रदर्शनांतल्या गमती सांगत बसला. शेवटीं जवळ शिल्लक राहिलेले एक रुपया दहा आणे जेव्हां त्यानें आईजवळ परत दिले तेव्हां तिनें त्याला जवळ घेऊन त्याचा एक पापा घेत म्हटलं, 'आहेच माझं बाळ तसं गुणाचं.'

गोष्ट संपवून मीं पाहिलं तों दादा कुठें दिसला नाहीं मला तिथें. शकू म्हणाली, 'तो आंत गेला. नाक शिंकरतोय बघा!!'

हेतु साधल्याच्या समाधानानें मी मुलांना म्हणालों, 'चला बघूं झोपायला! उशीरच झाला जरा आज.'

वाचनालय शाखा
BVBK-0404554
अ. क्र.
विभाग